# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 09.03.2025** **वार-रविवार**

---

**चंद्रकांतपाटील**

गरीब आणि गरजू विद्यार्थी - विद्यार्थिनींनी योग्य माध्यमातून आपल्या अडचणी पोहोचवल्या, तर त्या सोडवण्यास नेहमीच कटिबद्ध असल्याची भावना उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज पुण्यात व्यक्त केली. जिव्हाळा फाऊंडेशनच्या मदतीने १०० विद्यार्थिनींना पोषक आणि संतुलित आहार उपलब्ध करून देण्यात आला आहे. या उपक्रमाचा प्रारंभ चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. निरोगी जीवनशैलीसाठी पोषक आणि संतुलित आहार अतिशय महत्त्वाचा आहे. त्याशिवाय विद्यार्थ्यांची शैक्षणिक कामगिरी उंचावणं अशक्य आहे, असं पाटील म्हणाले.

**मनसे**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा १९वा वर्धापन दिन आज पुण्यात पिंपरी चिंचवड साजरा करण्यात आला. येत्या दोन वर्षात पक्ष मजबूत करु असा संकल्प मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी यावेळी कार्यकर्त्यांशी संवाद साधताना व्यक्त केला.

**मेट्रोआंदोलन**

पुणे मेट्रोमध्ये तरुणांना रोजगार मिळवा या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या कार्यकर्त्यांनी आज दुपारी पुणे मेट्रोच्या, पुणे महानगरपालिका स्थानकाच्या रुळांवर आंदोलन केलं. मेट्रोच्या सुरक्षा रक्षकांनी प्रसंगावधान राखत मेट्रो सेवा तत्काळ थांबवली. घटनेचं गांभीर्य ओळखून महामेट्रोचे अधिकारी, पोलीस आणि अग्निशामक दलाचे जवानही घटनास्थळी दाखल झाले. या आंदोलनादरम्यान मेट्रोची सेवा काही काळ बंद करण्यात आली होती. या सर्व आंदोलनकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे.

**<u>दिंडीसोहळा</u>**

जगद्गुरु संत श्री तुकाराम महाराजांचं चिंतनस्थळ अशी ओळख असलेल्या भंडारा डोंगराच्या पायथ्याला आजपासून येत्या 17 मार्चपर्यंत गाथा पारायण सोहळा आयोजित करण्यात आला आहे.
याचा प्रारंभ आज श्रीक्षेत्र देहू ते श्रीक्षेत्र भंडारा डोंगर अशा भव्य दिंडी सोहळ्याने झाला. टाळ-मृदुंगाचा गजर, आणि ज्ञानोबा तुकोबांचा नामघोष करीत हजारो भाविकांच्या उपस्थितीत हा दिंडी सोहळा पार पडला.

**<u>पुणेमनपा</u>**

पुणे महापालिका आगामी काही महिन्यात शहरात ३० ठिकाणी पर्जन्यमापक बसवणार आहे. तसंच आपत्ती व्यवस्थापन विभागांतर्गत, पावसाच्या स्थितीवर लक्ष ठेवण्यासाठी स्वतंत्र नियंत्रण कक्षही सुरू केला जाणार आहे. यासाठी सुमारे ३० लाख रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.

**<u>संविधानसंमेलन</u>**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्था म्हणजेच बार्टी आणि प्रबुद्ध भारत यांच्यावतीने देशातील पहिलं संविधान सन्मान संमेलन या महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात पुण्यात होणार आहे. या संमेलनाचं उद्घाटन समाज प्रबोधनकार, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक, माजी सनदी अधिकारी विकास

दिव्यकिर्ती यांच्या हस्ते होणार आहे. तर संमेलनाच्या अध्यक्षस्थानी वंचित बहुजन आघाडीचे ॲडवोकेट प्रकाश आंबेडकर असतील. संविधानाशी संबंधित विविध विषयांवर तज्ज्ञांची व्याख्यानं, चर्चासत्र आणि संवाद यात होणार असल्याचं प्रबुद्ध भारत मंडळानं कळवलं आहे

**<u>विश्वबंधुता</u>**

अंतःकरणातून प्रेमभावाने समानता आली, तर खऱ्या अर्थाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानात उल्लेखित केलेल्या समतेचा आणि बंधुतेचा आदर होईल, असं मत २७व्या विश्वबंधुता साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष आणि ज्येष्ठ समाजवादी विचारवंत प्राध्यापक सुभाष वारे यांनी पुण्यात व्यक्त केलं. विश्वबंधुता साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल विश्वबंधुता साहित्य परिषद, रयत शिक्षण संस्थेचं डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय आणि काषाय प्रकाशन यांनी प्रा. वारे यांच्या सत्कार समारंभाचं योजन केलं होतं; त्यावेळी ते बोलत होते. विश्वबंधुता मूल्यसंवर्धन समितीच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल प्रा. भारती जाधव यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला.

**<u>जीबीएस-मृत्यू</u>**

पुण्यातल्या ससून सर्वोपचार रुग्णालयात गुइलेन बॅरे सिंड्रोम  म्हणजेच  जीबीएसच्या आणखी एका रुग्णाचा मृत्यू झाला आहे. या आजाराने राज्यातल्या १२ रुग्णाचा मृत्यू झाला आहे. दरम्यान, राज्यातल्या जीबीएस रुग्णांची संख्या २२५ झाली आहे,अशी माहिती आरोग्य विभागानं दिली.

**<u>बाजारसमिती</u>**

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्रासह विविध राज्यातून शंभर ट्रक फळभाज्यांची आवक झाली. सिमला मिरची, कांदा आणि भुईमूग शेंगांच्या भावात घसरण झाली तर मटार, घेवडा महागले आहेत. पालेभाज्यांमध्ये शेपू, कांदापात, चाकवताच्या भावात वाढ झाली. उन्हाचा

कडाका वाढल्याने फळ बाजारात संत्री लिंबे आणि पपई या फळांना मागणी वाढली असून भावही वधरले आहेत. फुल बाजारात सध्या मंदीचं वातावरण आहे.

**<u>हॉकी</u>**

पिंपरीच्या मेजर ध्यानचंद मैदानावर हॉकी महाराष्ट्र संघटनेच्या पुढाकाराने राज्यस्तरीय अस्मिता हॉकी लीग स्पर्धा सुरू आहेत. या स्पर्धेत पर्णवी कानसे हिने केलेल्या एकमेव गोलाच्या जोरावर मुलींच्या उपकनिष्ठ गटात पुणे संघाने मुंबई उपनगर संघावर मात करत उपांत्य फेरीत धडक मारली. नागपूर आणि यवतमाळ संघानंही अंतिम चार  संघात स्थान मिळवलं आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज कमाल ३७ तर किमान १४ पूर्णांक ७ दशांश अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. उद्या तापमानात आणखी थोडी वाढ होण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**